• वर्ष : ०३ • अंक : ३३१ • पुणे • शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





सत्ता-पक्षांचे विरोधक राष्ट्रद्रोही नव्हे, तर राष्ट्रहितैषी! 3



रूढींना प्रश्न विचारणाऱ्या आवाजापासून ‘बीड फाइल्स’च्या चर्चेपर्यंतचा प्रवास 4

# सिंहगड रोड मेट्रोला गती; खडकवासला गावापर्यंत अंतिम स्थानक द्या

**सहा महिन्यांत काम सुरू होण्याची शक्यता; नांदेड सिटी गेट-खडकवासला उड्डाणपूल रस्ता, पार्किंग व बस डेपोचीही मागणी**

## नगरसेवक सुभाष नाणेकर, नगरसेविका धनश्री कोल्हे यांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्त्यावरील प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाला आता गती मिळण्याची शक्यता असून, येत्या सहा महिन्यांत मेट्रोच्या कामाला सुरुवात होईल, अशी माहिती मेट्रो अधिकाऱ्यांनी दिली. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांच्या विविध मागण्यांसंदर्भात नगरसेवक सुभाष नाणेकर व नगरसेविका धनश्री कोल्हे यांच्या उपस्थितीत मेट्रो अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



सिंहगड रस्त्यावरील वाढती वाहतूक कोंडी, झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि परिसराचा वेगाने होत असलेला विकास लक्षात घेता मेट्रो प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करून नागरिकांना त्याचा लाभ मिळावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

बैठकीत मेट्रोचे अधिकारी सोनू चौधरी, शशी भूषण यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती दिली. सध्या मेट्रोचे अंतिम स्थानक कोल्हेवाडी येथे प्रस्तावित असल्याचे सांगण्यात आले. मात्र, कोल्हेवाडीऐवजी खडकवासला गावापर्यंत मेट्रो नेऊन तेथेच अंतिम स्थानक करावे, अशी मागणी स्थानिक प्रतिनिधींनी केली.

मेट्रो प्रकल्प सुरू करण्यापूर्वी नांदेड सिटी गेट ते खडकवासला उड्डाणपूल हा रस्ता पूर्ण करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली. तसेच नांदेड फाटा ते कोल्हेवाडी दरम्यान उड्डाणपूल उभारून मेट्रोचा मार्ग पुढे न्यावा, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. या कामामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

मेट्रो स्थानकांच्या परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था उभारण्यासोबतच स्थानकाजवळ बस डेपोची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. मेट्रो आणि बस वाहतुकीची सांगड घातल्यास परिसरातील गावांमधून येणाऱ्या नागरिकांना मेट्रोपर्यंत सहज पोहोचता येईल, अशी भूमिका मांडण्यात आली.

मेट्रो अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मेट्रो स्टेशनपासून सुमारे ५०० मीटर परिसरातील बांधकामांना ४ एफएसआय मिळणार आहे. त्यामुळे परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. या विकास प्रक्रियेत स्थानिक युवकांना रोजगार, व्यवसाय आणि इतर व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. मेट्रोचा विस्तार खडकवासला गावापर्यंत झाल्यास नागरिकांची वाहतूक सुलभ होण्याबरोबरच खडकवासला धरण आणि परिसरातील पर्यटनाला चालना मिळू शकते. त्यामुळे मेट्रो प्रकल्पाचे नियोजन करताना भविष्यातील वाढती लोकसंख्या, वाहतूक व्यवस्था, पर्यटन आणि स्थानिक विकासाचा विचार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. या बैठकीस नगरसेवक सुभाष नाणेकर, नगरसेविका धनश्री कोल्हे, मेट्रोचे शशी भूषण, सोनू चौधरी, भाजप मंडळ अध्यक्ष विजय मते, भाजप नेते दत्ताभाऊ कोल्हे, अशोक मते, आनंद मते, ओबीसी मोर्चा शहर सरचिटणीस रमेश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, कालिदास चावट पाटील, लक्ष्मणराव हगवणे, माजी सरपंच विजय कोल्हे, विजय हगवणे, यशवंत कोल्हे, अविनाश कोल्हे, प्रवीण पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

सिंहगड रोड मेट्रोचा खडकवासला गावापर्यंत विस्तार झाल्यास वाहतूक कोंडीवर उपाय, नागरिकांना जलद सार्वजनिक वाहतूक आणि पर्यटनाला चालना—या तिन्ही पातळ्यांवर परिसराला मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

> “खडकवासला गावात अंतिम मेट्रो स्थानक झाल्यास परिसरातील नागरिकांसोबतच खडकवासला धरणाला भेट देणाऱ्या पर्यटकांनाही मोठा फायदा होईल. विविध गावांमधून येणाऱ्या प्रवाशांसाठी हे स्थानक अधिक सोयीचे ठरेल. त्यामुळे मेट्रोचा विस्तार खडकवासला गावापर्यंत करणे आवश्यक आहे.”
> **- सुभाष नाणेकर, नगरसेवक**

> “सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता मेट्रो प्रकल्प लवकर सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे. मेट्रोसोबतच रस्ता, पार्किंग आणि बस डेपोचे नियोजन झाले पाहिजे. स्थानिक नागरिकांना या प्रकल्पाचा थेट फायदा मिळावा आणि स्थानिक युवकांना रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आमचा पाठपुरावा सुरू राहील.”
> **- धनश्री कोल्हे, नगरसेविका**

## ठळक बातम्या

### राहुल गांधींच्या भेटीचा विद्यार्थिनीने नाकारला निरोप

**पुणे (आरंभ पर्व) : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या ‘छात्रों की गूंज’ कार्यक्रमापूर्वी पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरात निर्माण झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले आहे. संबंधित विद्यार्थिनीची भेट घेण्याचा निरोप राहुल गांधींकडून पाठवण्यात आला होता. मात्र, विद्यार्थिनीने त्यांना भेटण्यास स्पष्ट नकार दिला. मला कोणालाही भेटायचे नाही. मला राजकीय फायद्यासाठी वापरू नका अशी भूमिका विद्यार्थिनीने व्यक्त केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणामुळे महाविद्यालयातील वातावरण बिघडत असल्याचे सांगत महाविद्यालयीन परिसरात राजकारण आणू नये, अशी विनंतीही तिने केली.**

### महिलेच्या पोटात राहिले ग्लोव्हज

**पुणे (आरंभ पर्व) : बीड जिल्हा रुग्णालयात सिझेरियन प्रसूती शस्त्रक्रियेदरम्यान १९ वर्षीय महिलेच्या पोटात ग्लोव्हज आणि पेपर वाइप्स राहिल्याने तिची प्रकृती खालावली होती. हा संतापजनक प्रकार उघकीस आल्यावर महिलेला तातडीने पुण्यात हलविण्यात आले. शहरातील एका खाजगी रुग्णालयात ऐनवेळी आयसीयू बेड उपलब्ध न झाल्याने महिलेला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या महिलेवर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची माहिती ससून प्रशासनाने दिली आहे. बीड जिल्हा रुग्णालयात संध्या सुरज गायकवाड यांच्यावर १ ऑगस्ट रोजी सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर चार दिवसांनी त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. मात्र, घरी गेल्यानंतर त्यांच्या पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांना बीडमधील खासगी रुग्णालयात दाखल केले. तपासणी आणि स्कॅनिंग केल्यानंतर त्यांच्या पोटात काही वस्तू असल्याचे निदर्शनास आले.**

## प्रशासनाच्या संथ कारभाराचा फटका पुणेकरांना; ४१ निविदा रखडल्या

- **खड्ड्यांचे साम्राज्य कायम; १५ क्षेत्रीय कार्यालयांकडून अद्याप ठेकेदारांना कार्यादेश नाही**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पावसाळ्यामुळे पुणे शहरातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असताना खड्डे बुजविण्याच्या कामाला मात्र अपेक्षित गती मिळत नसल्याचे चित्र आहे. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांकडून खड्डे बुजविण्यासाठी काढण्यात आलेल्या तब्बल ४१ निविदा अद्याप रखडल्या असून, एकाही ठेकेदाराला अधिकृत कार्यादेश देण्यात आलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांतील खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असताना दुसरीकडे सत्ताधाऱ्यांनीही प्रशासनाविरोधात थेट रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे महापालिकेतील प्रशासन आणि सत्ताधारी यांच्यातील हा मुद्दा आता चांगलाच तापण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या अर्थसंकल्पात प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. १२ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. एप्रिलपासून अर्थसंकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण होऊन प्रत्यक्ष काम सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, निविदा प्रक्रियेला विलंब झाल्याने पावसाळा सुरू झाल्यानंतरही अनेक रस्त्यांवरील खड्डे कायम राहिले आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी क्षेत्रीय कार्यालयांना अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने त्यांना निधी उपलब्ध करून दिला.

## “सत्ता तुमची, मग खड्ड्यांसाठी आंदोलनाची भाषा कशाला?”

**काकासाहेब चव्हाणांचा सत्ताधाऱ्यांवर शरसंधान!**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेत सत्ता भाजपची असून प्रशासनावर नियंत्रणही सत्ताधारी पक्षाचेच आहे. असे असताना शहरातील खड्डे बुजवण्यासाठी सत्ताधारीच प्रशासनाला आठ दिवसांची मुदत देत असतील, तर हा पुणेकरांच्या प्रश्नाचा तोडगा नसून सत्ताधाऱ्यांच्या अपयशाची जाहीर कबुली आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकसाहेब चव्हाण यांनी केली.



दरवर्षी पावसाळा सुरू झाला की पुणे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात. त्यानंतर बैठका घेतल्या जातात, प्रशासनाला आदेश दिले जातात, आश्वासने दिली जातात; मात्र काही दिवसांनी परिस्थिती पुन्हा ‘जैसे थे’ होते. त्यामुळे या परिस्थितीला नेमके जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

पुणेकरांना सत्ताधाऱ्यांकडून आंदोलनाच्या घोषणा नकोत, तर खड्डेमुक्त, सुरक्षित आणि दर्जेदार रस्ते हवेत. रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असतील तर संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे. रस्ते वारंवार खोदण्याची वेळ येऊ नये, यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधून कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सत्ताधारी पक्षाने प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याची भाषा करण्यापेक्षा आधी प्रशासनावर आपला अंकुश सिद्ध करावा. “सत्ता आमची, पण प्रशासन आमचे ऐकत नाही” हा दावा पुणेकरांना मान्य होणार नाही. सत्ता आणि प्रशासन यांच्यात समन्वय ठेवून नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांचे निराकरण करणे ही सत्ताधाऱ्यांचीच जबाबदारी आहे.

स्थायी समितीच्या अध्यक्षांनी प्रशासनाला खड्डे बुजवण्यासाठी आठ दिवसांची मुदत देत रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे. मात्र, आठ दिवसांनंतर सत्ताधारी पक्षालाच प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याची वेळ येणार असेल, तर गेल्या कित्येक महिन्यांपासून पुणे महापालिकेवर सत्ता नेमकी कोणाची आहे? हा प्रश्न पुणेकरांनी विचारायचा का, असा सवाल चव्हाण यांनी उपस्थित केला.

महापालिकेवर सत्ता असतानाही प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याची वेळ सत्ताधाऱ्यांवर येणे ही प्रशासनाची नव्हे, तर सत्ताधाऱ्यांची हतबलता आणि प्रशासकीय नियंत्रणाच्या अपयशाची कबुली आहे. पुणेकरांच्या जीवाशी संबंधित असलेल्या रस्त्यांच्या प्रश्नावर इशारे आणि आंदोलनांपेक्षा सत्ताधारी म्हणून कृती करण्याची गरज आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने तातडीने शहरातील सर्व रस्त्यांचे सर्वेक्षण करून खड्डे बुजवावेत, निकृष्ट कामांची चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्या वतीने करण्यात आली.

## सहारा वृद्धाश्रमाचा सहावा वर्धापन दिन

**मायेच्या छायेत ज्येष्ठांच्या जीवनाला आधार; सहा वर्षांपासून निराधार ज्येष्ठांची अविरत सेवा**

**गौडगाव, ता. बार्शी (दै. आरंभ पर्व)**

कोरोना महामारीच्या कठीण काळात निराधार, बेघर आणि कुटुंबापासून दुरावलेल्या ज्येष्ठ नागरिकांना निवारा, अन्न आणि मायेचा आधार मिळावा, या उद्देशाने सुरू झालेल्या सहारा वृद्धाश्रम, गौडगावच्या सेवाकार्याला सहा वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त वृद्धाश्रमाचा सहावा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे.



गेल्या सहा वर्षांत वृद्धाश्रमाने केवळ ज्येष्ठांना निवारा देण्यापुरते कार्य मर्यादित न ठेवता त्यांच्या दैनंदिन जीवनाची काळजी घेतली आहे. सकाळचा चहा, सकाळी ११ वाजता पौष्टिक जेवण, सायंकाळी चहा-बिस्कीट आणि रात्रीचे जेवण अशी नियमित व्यवस्था येथे केली जाते. वयानुसार आवश्यक आहाराचा विचार करून भोजन दिले जाते.

वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना घरातील वातावरणाची अनुभूती मिळावी, यासाठी वर्षभर विविध सण-उत्सव आणि उपक्रम उत्साहात साजरे केले जातात. त्यांच्या वयानुसार विविध ॲक्टिव्हिटी घेतल्या जातात. मनोरंजनासाठी टीव्ही पाहणे, हरिपाठ, भजन, रेडिओ ऐकणे तसेच एकमेकांशी संवाद साधणे, अशा माध्यमातून ज्येष्ठांचा एकटेपणा दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

आरोग्य आणि स्वच्छतेलाही विशेष महत्त्व दिले जाते. नियमित दिनचर्या, स्वच्छता, आंघोळ, कपडे धुणे तसेच स्वतःच्या खोलीची आणि परिसराची स्वच्छता करण्यासाठी ज्येष्ठांना प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे शिस्तबद्ध आणि आनंदी वातावरणात त्यांचे दैनंदिन जीवन अधिक समाधानकारक होत आहे. ‘मायेचा सहारा... आयुष्याचा आधार...’ या भावनेतून सहारा वृद्धाश्रमाचे सेवाकार्य सुरू आहे. दानशूर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक, विविध संस्था आणि हितचिंतकांच्या सहकार्यामुळे गेली सहा वर्षे हे सेवाकार्य अखंडपणे सुरू आहे.

ज्येष्ठांना अन्न, निवारा आणि आवश्यक सुविधा देण्यासोबतच त्यांना माणुसकीची ऊब, आपुलकी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी सहारा वृद्धाश्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. पुढील काळातही समाजाच्या सहकार्याने हे सेवाकार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प असल्याचे संस्थापक राहुल भड यांनी सांगितले.

या सेवाकार्यात योगदान देणाऱ्या सर्व दाते, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक, हितचिंतक आणि शुभचिंतकांचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

राहुल भड संस्थापक, सहारा वृद्धाश्रम, गौडगाव संपर्क : ९४२३७६६१०० / ७०३०३०५५६५



## थोडक्यात पण महत्वाचे



## नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी हर्षवर्धन मानकर यांचा पुढाकार

पुणे (आरंभ पर्व) : एमआयटी कॉलेज परिसरातील वाढती विद्यार्थी वर्दळ, कॉलेजच्या मोठ्या बसेस आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीचा नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन नगरसेवक हर्षवर्धन मानकर यांनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मानकर यांनी परिसरातील सोसायट्यांमधील नागरिकांसोबत संबंधित प्रश्न वरिष्ठ वाहतूक पोलीस अधिकारी, कोथरूड पोलीस स्टेशन तसेच अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच एमआयटी कॉलेज प्रशासनासोबत बैठक घेऊन नागरिकांच्या अडचणी मांडण्यात आल्या. यावेळी नागरिकांनी मांडलेल्या समस्यांवर तातडीने प्रत्यक्ष कारवाई सुरू करण्याचे आश्वासन वरिष्ठ ट्रॅफिक पीआय गवळी यांनी दिले. वाहतूक सुरळीत राहावी, विद्यार्थ्यांच्या वर्दळीमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा आणि कॉलेजच्या बसेसमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा झाली. दरम्यान, एमआयटी कॉलेज परिसरातील स्टॉलवर बेकायदेशीररीत्या सिगारेट विक्री होत असल्याच्या तक्रारींचीही तातडीने दखल घेण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी करून सिगारेटचा साठा जप्त करण्यात आला असून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. यापुढे परिसरात अशा प्रकारची विक्री होऊ नये, यासाठी कडक सूचना देण्यात आल्या असून नियमित तपासणी करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. "नागरिकांच्या समस्या केवळ ऐकून न घेता त्या प्रत्यक्षात मार्गी लागणे आवश्यक आहे. एमआयटी परिसरातील वाहतूक कोंडी आणि इतर नागरी प्रश्न सोडविण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून सातत्याने पाठपुरावा केला जाईल," अशी भूमिका नगरसेवक हर्षवर्धन मानकर यांनी मांडली.

## सुमन नजित काळे यांचे दुःखद निधन



• हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन; सारोळे येथे अंत्यसंस्कार

बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील सारोळे येथील रहिवासी कै.सौ. सुमन नजित काळे (वय ४८) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने काळे कुटुंबीय, नातेवाईक तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सौ. सुमन काळे या सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयातील विधीज्ञ ॲड. बबीता लखन काळे यांच्या सासू होत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, आप्तेष्ट आणि मित्रपरिवारातून शोक व्यक्त करण्यात आला. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सारोळे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## 'भाटा'तून उलगडणार स्वप्नांसाठीच्या संघर्षाची कहाणी




पुणे (आरंभ पर्व) : पारंपरिक समाजरचनेत प्रत्येक समाजघटकाच्या कामाचे स्वरुप निश्चित केलेले होते. मात्र, बदलत्या काळानुसार ही परिस्थिति बदलत गेली आणि नवी पिढी नवी स्वप्ने पाहू लागली. बेलदार समाजातील नव्या पिढीची गोष्ट भाटा या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे.उत्कृष्ट स्टारकास्ट असलेला हा चित्रपट २८ ऑगस्ट रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे. व्ही. डि. एंटरटेनमेंट आणि मोरया उद्योग समूह यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली असून अरायव्हल स्टुडिओ प्रा. लि. या निर्मिती संस्थेने"भाटा"या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सुनील आबा जाधव आणि विजय चंद्रकांत चव्हाण हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. रिजवान शेख, मितेश पराडकर, सुनील कातकर हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. भरतराज नारायण यादव यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा विजय चंद्रकांत चव्हाण यांची आहे, तर पटकथा आणि संवाद शरद कारंडे यांचे आहेत. श्रेयस आंगणे यांनी चित्रपटाची गाणी लिहिली असून संगीतही त्यांचेच आहे तर छायाचित्रण हरेश सावंत यांचे आहे. .सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, अभिनेते अरुण नलावडे, प्रशांत मोहिते अभिनेत्री रुपाली जाधव, विजय कदम, अनिल नगरकर, लक्ष्मण देवभट, प्रेमा किरण बालकलाकार तनिष्का जाधव यांचा दमदार अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे. पिढ्यानपिढ्या दगड फोडत जगणाऱ्या बेलदार समाजातील एक बाप आपल्या मुलांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचं स्वप्न पाहतो. गरिबी, परिस्थिती आणि समाजाच्या पारंपरिक विचारांविरोधात उभा राहून आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगलं भविष्य देण्यासाठी संघर्ष करणाऱ्या बापाची गोष्ट भाटा या चित्रपटात मांडण्यात आला आहे. शिक्षण, नव्या पिढीची स्वप्ने, प्रथा-परंपरा या माध्यमातून एक वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न दिग्दर्शकानं केला आहे. उत्तम स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाचा टीजर उत्सुकता वाढवणारा आहे.

## सॅमसंगकडून भारतातील टॉप ४० युवा नवोन्मेषकांची घोषणा

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : सॅमसंग इंडियाने आपल्या प्रमुख युवा नवोन्मेष कार्यक्रम 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो'च्या २०२६च्या आवृत्तीतील टॉप ४० उपांत्य फेरीतील संघांची घोषणा केली आहे. देशातील तरुणांना त्यांच्या आजूबाजूच्या समस्या ओळखून तंत्रज्ञान, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून त्यांचे नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी या कार्यक्रमाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदा भारतात या कार्यक्रमाची पाचवी आवृत्ती होत असून, १४ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांना त्यात सहभागी होता येते. देशातील पुढील पिढीमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि नवोन्मेषाला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. टॉप ४० संघ १५ राज्ये आणि २६ शहरांचे प्रतिनिधित्व करतात. विशेष म्हणजे, निम्म्याहून अधिक संघ टियर-२ आणि टियर-३ शहरांमधून आले आहेत. वाराणसी, कोयंबतूर, गुन्टूर, अमृतसर, सुंदरगड आणि राजकोट यांसारख्या शहरांतील युवा नवोन्मेषकांनी राष्ट्रीय उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे.

# संघर्षातून स्वावलंबनाची वाट : सौ. सुनिता राजाराम डांगे यांचा प्रेरणादायी प्रवास

## शिक्षण, महिला सबलीकरण, सामाजिक क्षेत्रात अमूल्य योगदान



• शब्दांकन •
लक्ष्मण साबळे
(निवासी संपादक)

वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

**जीवनाच्या वाटचालीत संघर्षाला घाबरून न जाता जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमांच्या जोरावर यशाची नवी वाट निर्माण करता येते, याचा प्रेरणादायी आदर्श म्हणजे सौ. सुनिता राजाराम डांगे. चळे, ता. पंढरपूर हे माहेरचे गाव आणि मरवडे, ता. मंगळवेढा हे सासरचे गाव असलेल्या डांगे यांनी गेल्या दोन दशकांपासून महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकासासाठी सातत्याने योगदान दिले आहे.**

महिलांच्या आर्थिक व सामाजिक अडचणी जवळून अनुभवत असताना त्यांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात महिला बचत गटाच्या माध्यमातून झाली. गेल्या २० वर्षांत अनेक महिलांना एकत्र आणून बचतीची सवय, आर्थिक नियोजन, लघुउद्योग आणि स्वयंरोजगाराची दिशा देण्याचे काम त्यांनी केले. महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, व्यवसायासाठी मार्गदर्शन करणे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देणे, यावर त्यांनी भर दिला.

या कार्याला संस्थात्मक स्वरूप देण्यासाठी सन २०१५ मध्ये 'यशस्विनी विकास प्रतिष्ठान'ची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासोबत शिक्षण, रोजगार, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक विकासाच्या विविध उपक्रमांना चालना मिळाली. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी यशस्विनी महिला नागरिक पतसंस्था तसेच महिला बचत गट महासंघाची स्थापना करण्यात आली. महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण, आर्थिक मार्गदर्शन आणि कर्जाच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचा विचार करून शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी पुढाकार घेतला. नूतन इंग्लिश मीडियम स्कूल आणि नूतन प्री-प्रायमरी स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत विविध कौशल्यांचा विकास करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महिलांच्या कौशल्याला रोजगाराची जोड मिळावी, यासाठी MSME अंतर्गत 'सुनिता सेवा हब' हे लघुउद्योग व कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिले जात आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याचा विस्तार रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, महिला कौशल्य प्रशिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन, गरजू महिलांना कर्जासाठी मदत, बचत गटांना प्रोत्साहन, विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण, महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी मोफत संगणक व कौशल्यविकास अभ्यासक्रम तसेच डे-केअर सेंटर अशा विविध उपक्रमांपर्यंत झाला आहे.

वाढदिवसानिमित्त आपल्या सामाजिक कार्याचा अनुभव सांगताना सौ. सुनिता राजाराम डांगे म्हणतात, "जीवनामध्ये संघर्ष हा प्रत्येकाच्या वाट्याला येतो. मात्र संघर्षाला घाबरून थांबण्याऐवजी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमांच्या जोरावर परिस्थितीवर मात केली पाहिजे. स्वतःवर विश्वास ठेवून सातत्याने प्रयत्न केले, तर यश निश्चित मिळते. प्रत्येक महिलेने आपली क्षमता ओळखून स्वावलंबी होण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे यावे, हाच माझा संदेश आहे."

बचत गटाच्या माध्यमातून सुरू झालेला हा प्रवास आज महिला सक्षमीकरण, शिक्षण, रोजगार आणि कौशल्यविकासाच्या विविध क्षेत्रांत विस्तारला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी सामाजिक वाटचालीला अधिक व्यापक यश मिळावे आणि त्यांच्या कार्यातून असंख्य महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा मिळत राहावी, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक अभिष्टचिंतन!

## शाश्वत शहरे आणि सक्षम प्रकल्प अंमलबजावणीवर ICCRIP 2026 मध्ये मंथन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील वेगाने वाढणारे नागरीकरण, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि प्रकल्पांची वाढती गुंतागुंत लक्षात घेता शाश्वत नागरी विकास, संस्थात्मक क्षमता आणि प्रभावी प्रकल्प अंमलबजावणी या मुद्द्यांवर व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर NICMAR विद्यापीठ, पुणे येथे 21 आणि 22 ऑगस्ट रोजी बांधकाम, स्थावर मालमत्ता, पायाभूत सुविधा आणि प्रकल्प व्यवस्थापन क्षेत्रातील 10 व्या आंतरराष्ट्रीय परिषद 'ICCRIP 2026' चे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील बाणेर येथील विद्यापीठाच्या परिसरात सुरू असलेल्या या दोन दिवसीय परिषदेत उद्योग क्षेत्रातील अग्रणी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, व्यावसायिक आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ सहभागी झाले आहेत. भारताच्या बांधकाम व पायाभूत सुविधा क्षेत्राच्या भविष्यास आकार देणाऱ्या महत्त्वाच्या विषयांवर ज्ञानाची देवाणघेवाण आणि विचारमंथन हे या परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. धोरण, क्षमता आणि प्रकल्प अंमलबजावणी यांच्यातील दुवा' या विषयावरील परिसंवाद विशेष आकर्षण ठरला. भारताच्या नागरी विकासाच्या महत्त्वाकांक्षा शाश्वत आणि प्रभावी प्रकल्पांमध्ये रूपांतरित करताना येणारी आव्हाने, धोरण आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील दरी, संस्थात्मक क्षमता बळकट करण्याची गरज तसेच उद्योग, शिक्षण क्षेत्र आणि धोरणकर्त्यांमधील सहकार्य या विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली.

## कोंढवे धावडे येथे आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**कोंढवे धावडे (दै. आरंभ पर्व)**

वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त तसेच उत्तमनगर शिवसेना शाखेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त अंजनी लॉन्स, कोंढवे धावडे येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास प्राथमिक आरोग्य केंद्र सांगरूण, पुणे महानगरपालिका आरोग्य विभाग आणि सिंहगड डेंटल कॉलेजचे सहकार्य लाभले. शिबिराचे उद्घाटन नगरसेवक काका चव्हाण आणि हभप काळुराम मोकाशी यांच्या हस्ते झाले. यावेळी नागरिकांची दंतचिकित्सा तसेच विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. शिबिरात सुमारे १०० नागरिकांची दंत तपासणी, १५० नागरिकांची रक्त, हिमोग्लोबिन व रक्तातील साखरेची तपासणी, ५० नागरिकांची हर्निया तपासणी, तर १५० नागरिकांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ. पूनम गुडले, डॉ. नितीन म्हाळुंगे, डॉ. विभावरी कुवर यांच्यासह वैद्यकीय पथकाने तपासणीसाठी सहकार्य केले.

याशिवाय १५० नागरिकांची राज्य परिवहन महामंडळाच्या स्मार्ट कार्डसाठी नोंदणी करण्यात आली, तर १७० नागरिकांची आयुष्मान भारत योजनेअंतर्गत नोंदणी करण्यात आली. शिबिरादरम्यान उत्तमनगर-शिवणे परिसरातील ॲड. सलीम शेख, ॲड. मानसी तनपुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील गुणवंत नागरिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, अंकुश नाना पायगुडे, सचिन पासलकर, शामराव मोरे, गोरख मोकाशी, हनुमंत काटे, महादेव इनपुरे, पांडुरंग काटे, सुरेश किंडरे, रामदास गायकवाड, सागर म्होकर, पुंडलिक धावडे, पप्पू अण्णा गायकवाड, सागर शिर्के, संतोष पायगुडे, अजित पायगुडे, विक्रम मते यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

शिबिराचे आयोजन युवा सेनेचे सौरभ मोकाशी व आकाश पायगुडे यांनी केले. अंकुश पायगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## एआय प्लस स्मार्टफोनच्या निवडक मॉडेल्सच्या किमतीत वाढ

### घटक आणि उत्पादन खर्चातील वाढीच्या पार्श्वभूमीवर किमतीत सुधारणा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्मार्टफोन उद्योगातील विविध घटकांच्या तसेच उत्पादन, वाहतूक आणि इतर आवश्यक खर्चात सातत्याने होत असलेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर एआय प्लस स्मार्टफोनने आपल्या स्मार्टफोन श्रेणीतील निवडक मॉडेल्सच्या किमतीत सुधारणा केली आहे. सुधारित किमती आजपासून लागू झाल्या आहेत.

स्मार्टफोन उद्योग सध्या वाढत्या उत्पादन खर्चाच्या आव्हानातून जात आहे. विशेषतः मेमरीसह विविध महत्त्वाच्या घटकांच्या किमतीत वाढ झाली आहे. याशिवाय उत्पादन, वाहतूक आणि इतर आवश्यक बाबींच्या खर्चातही वाढ झाली आहे. या वाढत्या खर्चाचा परिणाम स्मार्टफोनच्या विविध किंमत श्रेणींवर होत आहे. ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी एआय प्लस स्मार्टफोनने आतापर्यंत वाढलेल्या खर्चाचा मोठा हिस्सा स्वतः स्वीकारला आहे. मात्र, खर्चातील वाढ सातत्याने सुरू असल्याने निवडक मॉडेल्सच्या किमतीत मर्यादित स्वरूपात वाढ करण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. याबाबत बोलताना माधव शेठ, मुख्य कार्यकारी अधिकारी, एआय प्लस स्मार्टफोन आणि संस्थापक, नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीज म्हणाले, "भारतीय ग्राहकांना उत्तम तंत्रज्ञान आणि योग्य मूल्य उपलब्ध करून देतानाच मजबूत आणि शाश्वत व्यवसाय उभारणे हे आमचे ध्येय आहे. वाढत्या घटकांच्या किमतीमुळे संपूर्ण उद्योगावर खर्चाचा दबाव निर्माण झाला आहे. यातील मोठा हिस्सा आम्ही आतापर्यंत स्वीकारला आहे. मात्र, वाढता खर्च लक्षात घेता किमतीत धोरणात्मक बदल करणे आवश्यक झाले आहे. तंत्रज्ञान ग्राहकांसाठी सुलभ आणि परवडणारे ठेवणे ही आमची भूमिका कायम राहील. एआय प्लस आपल्या सर्व उत्पादनांमधून ग्राहकांना उत्तम मूल्य देत राहील."

कंपनीच्या मते, किमतीतील हा बदल उद्योगातील बदलत्या खर्चाच्या परिस्थितीचा परिणाम आहे. ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत उत्तम उत्पादन अनुभव देण्यासोबतच व्यवसायाची दीर्घकालीन शाश्वतता राखण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

## प्रत्येक ऋतूत आकर्षक, मजबूत आणि देखणे छत




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

काही दशकांपासून फायबर सिमेंट रूफिंगला मजबूती आणि टिकाऊपणासाठी पसंती दिली जात आहे. मात्र, बदलत्या ग्राहक अपेक्षांमुळे या क्षेत्राचे स्वरूप आता वेगाने बदलत आहे. आज ग्राहकांना केवळ दीर्घकाळ टिकणारे छत नको आहे, तर दीर्घकाळ आपले सौंदर्य आणि पृष्ठभागाचा दर्जा कायम ठेवणारे रूफिंग सोल्युशनही अपेक्षित आहे. विशेषतः भारतातील निवासी आणि व्यावसायिक बांधकाम क्षेत्रात, मुसळधार पाऊस, आर्द्रता आणि बदलत्या हवामानाचा सामना करताना छताची कार्यक्षमता आणि देखणेपणा टिकवून ठेवणे महत्त्वाचे ठरत आहे. हवामानामुळे होणारी झीज कमी करणे, पृष्ठभागाचा फिनिश कायम राखणे आणि देखभालीची आवश्यकता कमी करणे या बाबी आता रूफिंगच्या निवडीतील महत्त्वाचे निकष बनले आहेत. या बदलत्या गरजा लक्षात घेऊन चारमिनार बिर्लानू अल्ट्रा-प्रीमियम फायबर सिमेंट रूफ्स विकसित करण्यात आले आहेत.

## प्रभाग ३५ मध्ये कचऱ्याचे ढीग

### पुणे मनपाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्ता परिसरातील हिंगणे खुर्द येथील खोराड वस्तीमध्ये ठिकठिकाणी कचरा साचल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रभाग क्रमांक ३५ मधील रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग निर्माण झाले असून, दुर्गंधी आणि डास-माशांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. या भागातील रस्त्याच्या कडेला घरगुती कचरा, प्लास्टिक तसेच इतर प्रकारची घाण मोठ्या प्रमाणात जमा झाली आहे. वेळेवर कचरा उचलला जात नसल्याने अस्वच्छतेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे चित्र आहे. या परिस्थितीचा पादचारी, वाहनचालक आणि स्थानिक रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असून, वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते यांनी महापालिकेच्या अधिकारी वर्गाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे. "संपूर्ण पुणे महानगरपालिका टाटा कंपनी किंवा एल अँड टी कंपनीला चालवायला दिली पाहिजे. अधिकाऱ्यांना आपल्या जबाबदारीचे काही सोयरसुतक नाही. नगरसेवकांचे तर सोडाच, अधिकारी महापौरांचेही ऐकत नाहीत, हे पुणे मनपाच्या अधिकारी वर्गाचे वास्तव आहे," अशी टीका शिवाजीराव मते यांनी केली. मते पुढे म्हणाले, "एकहाती सत्ता असूनही नागरिकांच्या मूलभूत समस्या सुटत नसतील, तर सत्ताधाऱ्यांनी शहराच्या सर्व भागांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. स्थायी समिती अध्यक्ष आणि गटनेत्यांनी केवळ पुण्यातील पेठांपुरते मर्यादित न राहता समाविष्ट पुण्यात जाऊन पाहावे. समाविष्ट भागातील रस्ते, कचरा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधांची परिस्थिती प्रत्यक्ष पाहिल्यानंतरच वास्तव समोर येईल," असे त्यांनी सांगितले.

## ५० हजारांची संपूर्ण रक्कम आठ दिवसांत परत

### येरवडा पोलिसांच्या सायबर पथकाची उल्लेखनीय कामगिरी; प्रभावी पाठपुराव्याने नागरिकाला दिलासा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मोबाईलवर आलेल्या अद्ययावत संदेशाच्या माध्यमातून मोबाईल हॅक करून एका नागरिकाची तब्बल ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणात येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने तत्परतेने कार्यवाही करत बँक व संबंधित व्यापाऱ्यांशी प्रभावी पत्रव्यवहार आणि दूरध्वनीद्वारे संपर्क साधत सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळाले असून, फसवणूक झालेली संपूर्ण ५० हजार रुपयांची रक्कम अवघ्या आठ दिवसांत नागरिकाला परत मिळवून देण्यात आली आहे.

येरवडा, पुणे येथील रहिवासी ताजुद्दीन बारभुईया यांना मोबाईल अद्ययावत करण्यासंदर्भातील संदेश प्राप्त झाला होता. त्यानंतर त्यांच्या मोबाईलशी संबंधित फसवणूक होऊन त्यांच्या खात्यातून ५० हजार रुपये परस्पर काढण्यात आले. याबाबत त्यांनी येरवडा पोलीस ठाण्यातील सायबर पथकाकडे तक्रार अर्ज दाखल केला. या प्रकरणाची नोंद सायबर अर्ज क्रमांक 31908260172461/2026 अशी करण्यात आली.

तक्रार प्राप्त होताच येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. फसवणुकीची रक्कम ज्या माध्यमातून हस्तांतरित झाली, त्या संबंधित बँक व व्यापाऱ्यांशी तातडीने संपर्क साधण्यात आला. तसेच आवश्यक कागदपत्रे, पुरावे आणि पाठपुरावा करून फसवणुकीची रक्कम परत मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. पोलिसांच्या या तत्पर आणि सातत्यपूर्ण कार्यवाहीमुळे ५० हजार रुपयांची संपूर्ण रक्कम आठ दिवसांच्या कालावधीत परत मिळविण्यात यश आले. त्यामुळे सायबर फसवणुकीला बळी पडलेल्या नागरिकाला मोठा दिलासा मिळाला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-४ चिलुमुला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त, येरवडा विभाग सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गीते आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) केशव दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश राठोड, पोलीस हवालदार समीर पिलाने, पोलीस शिपाई रविंद्र गाडेकर, मनोज भागवत, स्वप्निल पिंगळे आणि मिनाक्षी कापडे यांनी सायबर तपास पथकाच्या माध्यमातून ही कारवाई केली.

दरम्यान, मोबाईल अद्ययावत करणे, बँक खाते बंद होणे, केवायसी पूर्ण करणे अथवा अन्य कोणत्याही कारणाने आलेल्या संशयास्पद संदेशांमधील संकेतस्थळे किंवा दुवे उघडू नयेत. अनोळखी व्यक्तींना बँक खात्याची माहिती, संकेतांक किंवा इतर गोपनीय माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. सायबर फसवणूक झाल्यास विलंब न करता तातडीने पोलिसांशी संपर्क साधल्यास फसवणुकीची रक्कम परत मिळविण्याची शक्यता वाढते, हे या प्रकरणातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६








## ‘मावशी’ व ‘दाई’ यांचा अमनोरा येस फाउंडेशनतर्फे सन्मान

पुणे (आरंभ पर्व) : ससून रुग्णालयात रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. या सेवेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ‘मावशी’ आणि ‘दाई’ यांचा सन्मान होणे अत्यंत योग्य आहे, असे प्रतिपादन बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी केले. अमनोरा येस फाउंडेशन (सिटी ग्रुप) यांच्या वतीने ससून रुग्णालयातील मावशी व दाईंना स्व. मीरा देशपांडे सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी डॉ. पवार बोलत होते. कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लाप्पा जाधव, सिटी ग्रुपचे मुख्य सामाजिक अधिकारी विवेक कुलकर्णी, तसेच बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. या पुरस्काराचे स्वरूप ₹११,००० रोख रक्कम, साडी, शाल व सन्मानचिन्ह असे होते. ससून रुग्णालयातील श्रीमती गंगुबाई धोंडीबा दळवी, श्रीमती रुमिला रवी शिंदे, श्रीमती शैला सुरेश सैद, श्रीमती सुनीता रविंद्र कांबळे, श्रीमती गौरी रविंद्र गोहीरे आणि श्रीमती सुनीता कैलास गायकवाड यांचा त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी सन्मान करण्यात आला.



## जिल्हा परिषद शाळेमध्ये स्वातंत्र्य दिनाचा उत्सव उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : स्वातंत्र्य दिनाचे अवचित्य साधून खडकवाडी गावाच्या जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीचे आयोजन केले होते. वंदे मातरम, भारत माता कीं जय, जय जवान जय किसान यांसारख्या घोषणानीं गावाचा परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. प्रभात फेरीनंतर शाळेमध्ये झेंडावंदन करण्यात आले. शाळेतील काही विद्यार्थ्यांनी मराठी व इंग्लिश भाषेमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या विषयावरती भाषण केले. मुख्याध्यापक श्री. संदीप सरपाळे सरांनी शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सदर कार्यक्रमाला सरपंच श्री दत्ताजी बोडके, उपसरपंच सौ. संगीता मारुती तागुंदे, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, गावातील प्रगतशील शेतकरी व गावातील ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष श्री. परशुराम बाळासाहेब तागुंदे व सौ. मोहिनी परशुराम तागुंदे यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप केले व भविष्यात शाळेच्या विकासासाठी व विध्यार्थ्यांसाठी शासन स्थरावरून विविध उपक्रमांची उपाययोजना व मागणी करत असल्याचे सांगितले.

## दूर असले तरी पालकांच्या आरोग्याची काळजी घेणे आता सोपे

बंगळुरू (आरंभ पर्व) : नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने तरुण व्यावसायिकांना अनेकदा आपल्या कुटुंबापासून दूर राहावे लागते. अशा परिस्थितीत दूर शहरात राहूनही आई-वडिलांच्या नियमित औषधांची व्यवस्था करणे हे मोठे आव्हान ठरते. प्रिस्क्रिप्शनची माहिती ठेवणे, वेळेवर औषधे मागवणे, त्यांची घरपोच व्यवस्था करणे आणि दर महिन्याचा वाढता औषध खर्च सांभाळणे या सगळ्या जबाबदाऱ्या आता डिजिटल माध्यमातून सोप्या करण्याचा प्रयत्न प्लॅटिनमआरएक्स या औषधविषयक व्यासपीठाकडून केला जात आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून तरुण व्यावसायिक देशातील कोणत्याही शहरातून आपल्या पालकांसाठी नियमित औषधांची ऑनलाइन ऑर्डर करू शकतात. कंपनीच्या म्हणण्यानुसार, डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांमधील समान घटक आणि औषधाची रचना असलेले परवडणारे पर्याय उपलब्ध करून दिल्यामुळे नियमित औषधांच्या खर्चात ६० टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते. मधुमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन आजारांमध्ये रुग्णांना नियमितपणे औषधे घ्यावी लागतात. त्यामुळे औषधांचा पुरवठा खंडित होऊ नये, यासाठी कुटुंबीयांना सातत्याने लक्ष द्यावे लागते.

## पीएनजी ज्वेलर्सकडून पारंपरिक ‘मंगळसूत्र महोत्सवा’ची घोषणा



बारामती (आरंभ पर्व) : भारतीय वैवाहिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक असलेल्या मंगळसूत्राचे सांस्कृतिक महत्त्व जपत, पीएनजी ज्वेलर्सने आपल्या बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सवा'ची घोषणा केली आहे. हा महोत्सव १३ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भारतातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूममध्ये सुरू असणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय महिलांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, परंपरेचा वारसा जपत विविध शैलींतील मंगळसूत्रांचा सर्वाधिक वैविध्यपूर्ण आणि आकर्षक संग्रह ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'मंगळसूत्र महोत्सव' हा पीएनजी ज्वेलर्सचा एक वैशिष्ट्यपूर्ण वार्षिक उपक्रम म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात पारंपरिक, आधुनिक तसेच हलक्या वजनाच्या मंगळसूत्रांचा विस्तृत संग्रह उपलब्ध असून, सणासुदीच्या प्रसंगांपासून ते दैनंदिन वापरापर्यंत प्रत्येक गरज पूर्ण करणाऱ्या विविध डिझाइन्स ग्राहकांना पाहायला मिळतील. यंदाच्या संग्रहात आकर्षक सोन्याची मंगळसूत्रे, सॉलिटेअर-प्रेरित डायमंड मंगळसूत्रे, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त मिनिमलिस्ट डिझाइन्स तसेच व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देणाऱ्या आधुनिक शैलीतील मंगळसूत्रांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व वयोगटातील विवाहित महिलांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन साकारण्यात आलेला हा संग्रह, श्रावण महिन्याच्या निमित्ताने पत्नी, सून किंवा कुटुंबातील महिलांना अर्थपूर्ण भेट देऊ इच्छिणाऱ्या पती आणि कुटुंबीयांसाठीही एक उत्तम पर्याय ठरणार आहे. उत्कृष्ट कारागिरी आणि परवडणाऱ्या किमतीचा समतोल साधत, विविध शैली, आवडीनिवडी आणि बजेटनुसार मंगळसूत्रांची निवड करण्याची संधी या महोत्सवातून ग्राहकांना मिळणार आहे. या महो्सवादरम्यान ग्राहकांना मंगळसूत्रांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेस केवळ ७.९९% पासून उपलब्ध असतील.

# सत्ता-पक्षांचे विरोधक राष्ट्रद्रोही नव्हे, तर राष्ट्रहितैषी!

## सत्ताधाऱ्यांच्या दोषांवर बोट ठेवणाऱ्यांना ‘दिमागी नक्षल’ म्हणणे ही सत्तालोलुप मानसिकता : गोपाळदादा तिवारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणारे, सरकारच्या चुका निदर्शनास आणून देणारे आणि देशातील विद्यार्थी, तरुण, शेतकरी व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणारे नागरिक राष्ट्रद्रोही नसून राष्ट्रहितैषी आहेत. सत्ताधाऱ्यांच्या दोषांवर बोट ठेवणाऱ्यांना ‘दिमागी नक्षल’ अशी उपमा देणे ही लोकशाहीच्या मूलभूत भावनेलाच धक्का देणारी सत्तालोलुप मानसिकता आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात ‘दिमागी नक्षल’ असा उल्लेख केल्यानंतर त्यावरून राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मोदी यांनी देशातील सशस्त्र नक्षलवाद संपुष्टात आल्याचे सांगताना ‘दिमागी नक्षल’ विचारसरणीपासून देशाला सावध राहण्याचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर गोपाळदादा तिवारी म्हणाले की, भारत ही लोकशाहीची जननी असल्याचा अभिमान व्यक्त केला जात असताना लोकशाहीमध्ये असहमती, प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि सरकारच्या धोरणांवर टीका करण्याचे स्वातंत्र्यही तितकेच महत्त्वाचे आहे. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला देशविरोधी ठरविण्याचा प्रयत्न केला गेला, तर लोकशाहीचा अर्थच उरत नाही.

“देशातील विद्यार्थी आणि तरुणांच्या भवितव्याचा विचार करणारे राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, नागरी समाजातील घटक आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी आवाज उठवणाऱ्या चळवळी या लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहेत. त्यांना ‘दिमागी नक्षल’ ठरविण्याची भाषा लोकशाहीवरील आघात ठरू शकते,” असे तिवारी यांनी म्हटले.

‘सत्तेला प्रश्न विचारणे हा राष्ट्रद्रोह कसा?’

सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन देणे म्हणजेच राष्ट्रप्रेम आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे राष्ट्रद्रोह, अशी व्याख्या लोकशाही व्यवस्थेला मान्य होऊ शकत नाही. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्याच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करणे, धोरणांचे परीक्षण करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणे हा लोकशाहीतील विरोधी आवाजाचा मूलभूत अधिकार आहे, असे तिवारी यांनी स्पष्ट केले.

देशातील विद्यार्थी, तरुण, शेतकरी, लघुउद्योजक आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे शासनाने संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. विविध प्रश्नांवर समाजातील विविध घटकांकडून आवाज उठत असल्याचे चित्र देशभर दिसत आहे. या आवाजांकडे विरोध म्हणून नव्हे, तर लोकशाहीतील अभिप्राय म्हणून पाहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

“लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षाइतकीच विरोधकांची भूमिकाही महत्त्वाची असते. सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, चुकीचे निर्णय निदर्शनास आणून देणे आणि जनतेचे प्रश्न सत्तेपर्यंत पोहोचविणे हे विरोधकांचे घटनात्मक कर्तव्य आहे. त्यामुळे सत्तेवर टीका करणाऱ्यांना राष्ट्रद्रोही किंवा देशविरोधी ठरविण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक आहे,” असे तिवारी यांनी सांगितले.

पंतप्रधानांनी संसदेच्या पायरीवर नतमस्तक होऊन संसदेच्या सर्वोच्चतेचा सन्मान व्यक्त केला होता. संविधानासमोरही त्यांनी आदर व्यक्त केला आहे. मात्र, संविधानातील लोकशाही मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण हीच त्या आदराची खरी कसोटी असल्याचे तिवारी म्हणाले.

### ‘विद्यार्थ्यांनी आपल्या ज्वलंत समस्या मांडाव्यात’

विद्यार्थी आणि तरुणाई ही देशाची भविष्यातील शक्ती आहे. त्यामुळे त्यांच्या मनातील प्रश्न ऐकून घेणे, त्यावर सार्वजनिक चर्चा घडवून आणणे आणि त्यांना धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेत स्थान देणे आवश्यक आहे. पुण्यातील कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या समस्या पुढे येतील आणि त्यावर व्यापक चर्चा होईल, अशी अपेक्षा तिवारी यांनी व्यक्त केली. “आज देशातील लोकशाही आणि घटनात्मक मूल्यांसमोर आव्हाने असल्याची भावना समाजातील अनेक घटक व्यक्त करीत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी गप्प न बसता आपले प्रश्न मांडणे, सरकारला प्रश्न विचारणे आणि देशाच्या भवितव्याबाबत आपले मत व्यक्त करणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणारा तरुण देशद्रोही नसतो; उलट देशाच्या भवितव्याची चिंता करणारा जागरूक नागरिक असतो,” असे गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले. पुण्यातील राहुल गांधी यांच्या विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रमाला या पार्श्वभूमीवर राजकीय तसेच सामाजिक महत्त्व प्राप्त झाले असून, विद्यार्थी आणि तरुणाईच्या प्रश्नांवरून आगामी काळात राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.

## जागरूक नागरिकच घडवतील स्वच्छ, सुरक्षित आणि सुकर पुणे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुणे शहराचा झपाट्याने विकास होत असताना वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, कचरा, अतिक्रमणे, अपुरा पाणीपुरवठा आणि धोकादायक विद्युत डीपी यांसारख्या समस्यांचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. या प्रश्नांवर केवळ प्रशासनाला दोष देऊन उपाय होणार नाही. जागरूक नागरिक, जबाबदार लोकप्रतिनिधी आणि कार्यक्षम प्रशासन यांचा समन्वय आवश्यक आहे.

नऱ्हे परिसरासह शहरातील अनेक भागांत वाहतूक कोंडी गंभीर झाली आहे. अरुंद रस्ते, अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे आणि वाढती वाहनसंख्या यामुळे विद्यार्थ्यांसह कामगार, रुग्ण आणि वाहनचालकांना त्रास सहन करावा लागतो. प्रमुख चौकांत वाहतूक नियोजन, अनधिकृत पार्किंगवर कारवाई, अतिक्रमण हटविणे आणि शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात ‘नो पार्किंग’ क्षेत्र निश्चित करणे गरजेचे आहे. नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

कचरा आणि अतिक्रमण हीदेखील शहराच्या आरोग्य व सौंदर्याशी संबंधित गंभीर आव्हाने आहेत. ओला-सुका कचरा वर्गीकरण, नियमित कचरा संकलन, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर दंड आणि नियमांनुसार अतिक्रमणांवर कारवाई आवश्यक आहे. ‘माझा परिसर, माझी जबाबदारी’ ही भावना प्रत्येक नागरिकाने अंगीकारली पाहिजे.

**शब्दांकन : प्रा. भूपेश शुक्ला**
**७७५५९०२०२०**



## ‘बीड फाइल्स’मध्ये तृप्ती देसाईंची भूमिका ठरणार लक्षवेधी

### बीडमधील गुन्हेगारीवर चित्रपटातून परखड भाष्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था आणि या परिस्थितीमुळे सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता यावर भाष्य करणारा ‘बीड फाइल्स’ हा नवा मराठी चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर येत आहे.

या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्याशी संबंधित व्यक्तिरेखा आणि सामाजिक वास्तवावर विशेष प्रकाश टाकला जाणार असल्याने चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे. डॉ. डोईफोडे फिल्मसच्या बॅनरखाली निर्मिती होत असलेल्या ‘बीड फाइल्स’मध्ये बीडमधील गुन्हेगारीच्या घटनांमागील सामाजिक आणि व्यवस्थात्मक वास्तवाचा वेध घेण्यात येणार आहे. गुन्हेगारीला खतपाणी घालणारी परिस्थिती, व्यवस्थेतील त्रुटी आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत.

चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरचे नुकतेच अनावरण करण्यात आले. या पोस्टरमधून चित्रपटाच्या गंभीर आणि वास्तववादी आशयाची झलक पाहायला मिळते. विशेषतः तृप्ती देसाई यांना केंद्रस्थानी ठेवून मांडण्यात येणारा सामाजिक दृष्टिकोन चित्रपटाला वेगळी धार देणार असल्याचे दिसून येत आहे.

डॉ. शशिकांत डोईफोडे हे चित्रपटाचे निर्माते असून शिवराज बांगर सह-निर्माते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन गणेश शिंदे करणार आहेत. चित्रपटातील इतर कलाकारांची नावे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे तृप्ती देसाईंची भूमिका नेमकी कशा स्वरूपाची असेल आणि बीडमधील वास्तवाचे चित्रण कोणत्या पद्धतीने केले जाणार, याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

मनोरंजनासोबतच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न करणारा ‘बीड फाइल्स’ हा चित्रपट बीडमधील गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधण्याची शक्यता आहे.

# अनिकेत आंधळे यांचा क्रिकेटच्या मैदानावर ‘डंका’

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिद्द, चिकाटी आणि अफाट परिश्रमाच्या जोरावर यशाचे शिखर कसे गाठता येते, याचे एक अत्यंत प्रेरणादायी आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे येरवडा कारागृहातील कर्मचारी अनिकेत अशोक आंधळे! एका अत्यंत सामान्य कुटुंबातून आलेल्या अनिकेत यांनी शासकीय सेवेतील आपली अत्यंत जबाबदारीची नोकरी चोख बजावत, दैनंदिन आव्हानांवर मात करत क्रिकेटच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर स्वतःची दिमाखदार ओळख निर्माण केली आहे. दररोज व्यावसायिक सराव करणाऱ्या अनेक खेळाडूंना मागे टाकत त्यांनी थेट आंतरराष्ट्रीय पटलावर भारताचा आणि येरवडा कारागृह विभागाचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे.



अनिकेत यांच्या क्रिकेट प्रवासाची सुरुवात २०१६ मध्ये आळेफाटा येथून झाली. सुरुवातीच्या काळात काही तांत्रिक अडचणींमुळे आणि गुणांची टाणाताण झाल्यामुळे त्यांना क्रिकेटपासून काही काळ सक्तीने दूर राहावे लागले होते. मात्र, कोणत्याही अपयशाने खचून न जाता नव्या दमाने आणि तीव्र इच्छेने त्यांनी पुन्हा मैदानात पाऊल ठेवले. स्थानिक स्तरावरील सामन्यांमध्ये दमदार कामगिरी केल्यानंतर त्यांनी नामांकित 'Cap of Pathans' च्या ट्रायलमध्ये शानदार यश मिळवले. त्यांच्यातील हीच अफाट क्षमता ओळखून उत्तर प्रदेशच्या प्रशिक्षकांनी त्यांना आपल्या क्लबकडून खेळण्याची सुवर्णसंधी दिली आणि इथूनच त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीला एक नवी दिशा मिळाली. जानेवारी २०२६ मध्ये नेपाळ येथे पार पडलेल्या 'इंडो-नॅशनल चॅम्पियनशिप' (Indo-National Championship) या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत अनिकेत यांनी ऐतिहासिक आणि चमकदार खेळी केली. नेपाळविरुद्ध झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात त्यांनी अवघ्या ५४ चेंडूंत ८५ धावांची धडाकेबाज आणि आक्रमक फलंदाजी करत भारताला सुवर्णपदक मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

त्यानंतर नॅशनल क्रिकेट लीगच्या (NCL) वनडे सामन्यातही ६८ चेंडूंत ७७ धावा फटकावत त्यांनी पुन्हा एकदा आपले मैदानावरील वर्चस्व सिद्ध केले. भारतातील तब्बल २० राज्यांमधील खेळाडूंमधून महाराष्ट्रातून ७ व्या रँकिंगने निवड झालेल्या अनिकेत यांना या संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'बेस्ट बॅटर' आणि तब्बल ८,१४० रँकिंग पॉईंट्ससह 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर' (MVP) म्हणून बहुमान देण्यात आला.

अनिकेत यांचा हा यशाचा आलेख इथेच थांबलेला नाही. आगामी आंतरराष्ट्रीय फायनल कॅम्पसाठी त्यांची निवड झाली असून, श्रीलंका दौऱ्यासाठी ते लवकरच क्लब मार्फत रवाना होणार आहेत. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील आपल्या कामगिरीला अधिक धारदार आणि अचूक करण्यासाठी ते ०१ सप्टेंबर २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीत पुण्यातील नामांकित 'PYC हिंदू जिमखाना' येथे कठोर सराव सत्रात भाग घेणार आहेत.

कॅम्प लिस्टमध्ये नाव आल्यामुळे आणि त्यांची मैदानावरील कामगिरी पाहता, जर त्यांनी हीच गती व लय कायम ठेवली तर येत्या काही दिवसांत ते रणजी ट्रॉफी, आयपीएल (IPL) किंवा थेट भारतीय कसोटी संघात देशाचे प्रतिनिधित्व करताना दिसतील, असा ठाम विश्वास क्रीडा जगतातून व्यक्त केला जात आहे.

शासकीय सेवेतील कडक शिस्त, ड्युटीची वेळेची बंधने आणि खेळाचा सराव यांचा योग्य तोल सांभाळणे अत्यंत आव्हानात्मक असते. परंतु, येरवडा कारागृह प्रशासनाने अनिकेत यांच्या पाठीशी सुरुवातीपासूनच खंबीरपणे उभे राहून दिलेला पाठिंबा खरोखरच कौतुकास्पद ठरला आहे. या सहकार्यामुळेच आज आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची ही मोठी संधी मिळाल्याचे अनिकेत यांनी मनमोकळेपणाने सांगितले. अनिकेत यांनी आपल्या या यशाचे संपूर्ण श्रेय येरवडा कारागृह प्रशासनाला दिले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुण्यात 'टेक्नॉलॉजी अवेअरनेस रोडशो २०२६'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : अत्याधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञान आणि संशोधनातील नव्या संधींची माहिती वैज्ञानिक, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने निरव बायोसोल्युशन्स प्रा. लि. यांच्या वतीने १९ व २० ऑगस्ट २०२६ रोजी NCCS आणि IISER, पुणे येथे 'टेक्नॉलॉजी अवेअरनेस रोडशो २०२६'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात Abbexa, OHAUS, Thermo Fisher Scientific, OTT Scientific यांसारख्या जागतिक ब्रँड्सच्या अत्याधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञानासोबत Make in India अंतर्गत विकसित होणाऱ्या deNOVO Biolabs च्या तंत्रज्ञानाचेही सादरीकरण करण्यात आले. रोडशोला संशोधक, वैज्ञानिक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अत्याधुनिक तंत्रज्ञान, त्याचे संशोधनातील उपयोग आणि प्रयोगशाळांच्या बदलत्या गरजांबाबत सहभागींनी मोठ्या उत्सुकतेने माहिती घेतली व तज्ज्ञांशी संवाद साधला. या उपक्रमासाठी निरव बायोसोल्युशन्सचे डायरेक्टर प्रविण शर्मा, यांच्यासह फिजो जेकब, तुषार खंडाळे NBSPLच्या टीमने सक्रिय सहभाग घेतला.

### पेप्सिको इंडियाच्या पुणे प्लांटला २५ वर्षे पूर्ण; उत्पादन क्षमता वाढली




पुणे (आरंभ पर्व) : स्नॅक्स आणि पेये क्षेत्रातील प्रमुख कंपनी पेप्सिको इंडियाच्या पुणे उत्पादक प्रकल्पाने २५ वर्षांचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे. २००१ मध्ये सुरू झालेल्या या १५ एकर क्षेत्रावरील प्रकल्पात आतापर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली आहे. कंपनीच्या 'भारतात उत्पादन, भारतासाठी उत्पादन' या बांधिलकीचे प्रतीक ठरलेल्या या प्रकल्पाची वार्षिक उत्पादन क्षमता ६२ हजार १०० टनांवर पोहोचली आहे. पुणे प्रकल्पात लेज, कुरकुरे, चीतोज, सॉलिड मस्ती आणि अंकल चिप्स यांसारख्या लोकप्रिय खाद्यपदार्थांचे उत्पादन केले जाते. या उत्पादनांचा मोठा पुरवठा पश्चिम आणि दक्षिण भारतातील ग्राहकांसाठी केला जातो. गेल्या २५ वर्षांत या प्रकल्पाची उत्पादन क्षमता तब्बल सहापट वाढल्याचे कंपनीने म्हटले आहे. या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे १,४०० जणांच्या रोजगाराला हातभार लागला आहे. याशिवाय महाराष्ट्रातील स्थानिक पुरवठादार, पूरक उद्योग, शेतकरी आणि उत्पादनाशी संबंधित विविध घटकांच्या विकासालाही या प्रकल्पामुळे चालना मिळाली आहे.

# आठ दिवस घाण काढून घेतली; आज कामावरून कमी केले!

## धायरीतील ४० हून अधिक महिला व तरुण कामगारांचा ठेकेदारावर गंभीर आरोप; न्यायाची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत धायरी येथील धारेश्वर आरोग्य कोठी परिसरात काम करणाऱ्या सुमारे ४० हून अधिक गरीब, गरजू महिला व बेरोजगार तरुणांवर अचानक कामावरून कमी करण्यात आल्याने उपासमारीची वेळ आली आहे. मागील आठ दिवसांपासून परिसरातील साचलेली घाण, कचऱ्याचे ढीग उचलण्याचे काम करून घेतल्यानंतर अचानक कामावरून कमी करण्यात आल्याचा आरोप या कामगारांनी केला आहे.




कामगारांच्या म्हणण्यानुसार, मागील आठ दिवसांपासून त्यांच्याकडून नियमितपणे परिसरातील कचरा व घाण साफ करून घेतली जात होती. दररोज हजेरी घेतली जात होती, तसेच काम करतानाचे फोटोही काढून पाठवले जात होते. त्यामुळे आपल्याला नियमित रोजगार मिळेल, या आशेने महिला व तरुण कामगार काम करत होते. मात्र, आज सकाळी हे कामगार नेहमीप्रमाणे कामावर गेले असता त्यांना अचानक कामावरून कमी करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या जागी नवीन कामगार घेण्यात आल्याची माहितीही त्यांना देण्यात आली. त्यामुळे आठ दिवस काम करूनही रोजगार गमावल्याने या कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कचरा उचलण्याचे काम सिद्धिविनायक कार्पोरेट या कंपनीकडे असल्याचे संबंधित कामगारांनी सांगितले. आठ दिवस काम करून घेतल्यानंतर अचानक कामावरून कमी करण्यात आल्याने कंपनीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

"दुसरे कामगारच घ्यायचे होते, तर आमच्याकडून आठ दिवस काम का करून घेतले? मोठ्या प्रमाणावर साचलेली घाण साफ करून घेण्यासाठी आमचा वापर करून नंतर कामावरून कमी करण्यात आले का?" असा संतप्त सवाल या कामगारांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, कचरा व्यवस्थापनाच्या खासगीकरणाच्या प्रक्रियेत कोट्यवधी रुपयांची कंत्राटे दिली जात असताना प्रत्यक्ष कचरा साफ करणाऱ्या गरीब महिला व बेरोजगार तरुणांच्या रोजगाराची मात्र कोणतीही हमी राहिलेली नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे.

मोठ्या आशेने कामावर आलेल्या महिला व तरुणांना अचानक रोजगारापासून वंचित करणे योग्य नसून, या प्रकरणाची महापालिका प्रशासनाने चौकशी करून संबंधित कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे. आठ दिवस काम घेतलेल्या कामगारांच्या हजेरीची नोंद, कामाचे फोटो आणि त्यांना देय असलेली मजुरी याबाबतही प्रशासनाने स्पष्टता द्यावी, अशी मागणी कामगारांनी केली आहे.

## एचडीएफसी बँकेचा १.७५ अब्ज डॉलरचा परदेशी बाँड इश्यू

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

एचडीएफसी बँकेने आपल्या व्यवसायाच्या वाढीसाठी परदेशी बाँडच्या माध्यमातून 1.75 अब्ज डॉलर उभारले आहेत. एचडीएफसी बँकेच्या GIFT सिटी शाखेमार्फत 1.75 अब्ज डॉलरचे वरिष्ठ असुरक्षित बाँड (सीनियर अनसिक्युअर्ड बॉन्ड) जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती बँकेने नियामकांना दिलेल्या अहवालात सांगितली. जागतिक आर्थिक संकटानंतर एखाद्या भारतीय बँकेने उभारलेला हा सर्वात मोठा निधी आहे. या बाँड इश्यूला आशिया, अमेरिका आणि युरोपमधील गुंतवणूकदारांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. खासगी क्षेत्रातील या बँकेने 50 कोटी डॉलरचे बाँड 5.16 टक्के व्याजदराने

- **जागतिक आर्थिक संकटानंतर भारतीय बँकेची सर्वात मोठी निधी उभारणी**

(कूपन रेट) जारी केले असून, त्याची मुदत 3 वर्षांची आहे. उर्वरित 1.25 अब्ज डॉलरचे पाच वर्षांच्या मुदतीचे बाँड असून, त्यावर 5.4 टक्के व्याजदर (कूपन रेट) देण्यात येणार आहे. हे बाँड इंडिया आयएनएक्स (इंडिया इंटरनॅशनल एक्सचेंज (आयएफएससी) लिमिटेड) आणि एनएसई इंटरनॅशनल एक्सचेंज (एनएसई-आयएक्स) येथे सूचीबद्ध केले जाणार आहेत.

एचडीएफसी बँकेने जूनपासून आतापर्यंत डॉलर बाँडच्या माध्यमातून 2.5 अब्ज डॉलरचा निधी उभारला आहे.

## दूषित पाणीसमस्येवर 'हेडर'ची उपाययोजना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मागील अनेक वर्षांपासून बारांगणी मळा येथील विहिरीतून धायरी, DSK परिसरासह आसपासच्या भागाला पाणीपुरवठा होत आहे. मात्र पावसाळ्यात पावसाचे पाणी विहिरीत झिरपल्यामुळे अनेकदा पाणी दूषित होण्याची समस्या निर्माण होत होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांना अशुद्ध व दूषित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत होता. या गंभीर प्रश्नावर केवळ तात्पुरती उपाययोजना न करता कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी स्थानिक नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांनी सातत्याने महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळावे, तसेच पावसाळ्यात



विहिरीचे पाणी दूषित होण्याची समस्या कायमची दूर व्हावी, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्याने भेटी घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली. काकासाहेब चव्हाण यांच्या या पाठपुराव्यानंतर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त मा. नवनीत कौर, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकुमार जगताप तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी बारांगणी मळा येथील विहिरीची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीनंतर

### काकासाहेब चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

विहिरीला पर्याय म्हणून १४ मीटर लांबीचा आणि सुमारे साडेपाच फूट व्यासाचा हेडर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी आता प्रत्यक्ष सुरू झाली असून, हेडर विहिरीजवळ आणून ठेवण्यात आला आहे. येत्या काही दिवसांत हेडर बसविण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे विहिरीत पावसाचे अशुद्ध पाणी झिरपून पाणी दूषित होण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असून, धायरी, DSK परिसरासह आसपासच्या नागरिकांना अधिक स्वच्छ आणि सुरळीत पाणीपुरवठा करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. सध्या धायरीकरांना दिवसातून साधारण २० ते २५ मिनिटे किंवा काही वेळा अर्धा तास पाणी मिळत आहे. मात्र नागरिकांना केवळ दूषित पाण्यापासून मुक्त करणे एवढेच उद्दिष्ट नसून, भविष्यात धायरी परिसरातील नागरिकांना दररोज नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणी मिळावे, यासाठीही नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांचा पाठपुरावा सुरू आहे. गेल्या आठ महिन्यांपूर्वी महानगरपालिकेत निवडून आल्यानंतर नागरिकांनी दिलेल्या मतरूपी आशीर्वादाच्या बळावर धायरीच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी काकासाहेब चव्हाण यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू ठेवले आहे.

# तृप्ती देसाई : रूढींना प्रश्न विचारणाऱ्या आवाजापासून 'बीड फाइल्स'च्या चर्चेपर्यंतचा प्रवास

**महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांच्याशी सहमत असो वा असहमती, त्यांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करणे सहज शक्य नसते. तृप्ती देसाई हे असेच एक नाव. महिलांच्या हक्कांसाठी आक्रमकपणे रस्त्यावर उतरणारी कार्यकर्ती, प्रस्थापित परंपरांना थेट आव्हान देणारी आंदोलक आणि सामाजिक प्रश्नांना व्यापक चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती म्हणून तृप्ती देसाई यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली.**

**(दै. आरंभ पर्व)**

आज बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न आणि व्यवस्थेतील त्रुटींवर भाष्य करणाऱ्या 'बीड फाइल्स' या मराठी चित्रपटाची चर्चा सुरू असताना तृप्ती देसाई यांचे नाव पुन्हा चर्चेत येत आहे. कारण सामाजिक अन्याय, व्यवस्थेतील विसंगती आणि सामान्य माणसाच्या हक्कांचा प्रश्न उपस्थित करण्याची त्यांची कार्यपद्धती या चित्रपटाच्या सामाजिक आशयाशी संवाद साधणारी ठरते.

**आंदोलनातून घडलेली ओळख**

तृप्ती देसाई यांचा सामाजिक कार्यातील प्रवेश अचानक झालेला नाही. त्या सुरुवातीला पुण्यातील झोपडपट्टीवासीयांच्या प्रश्नांशी संबंधित कामात सहभागी झाल्या. २००३ मध्ये त्यांनी 'क्रांतिवीर झोपडी विकास महासंघा'च्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्रश्नांवर काम सुरू केले. त्यानंतर त्यांचा प्रवास महिला हक्क आणि सामाजिक प्रश्नांच्या आंदोलनाकडे वळला. २०१० मध्ये त्यांनी भूमाता रणरागिणी ब्रिगेडची स्थापना केली. या प्रवासाने पुढे त्यांना महाराष्ट्राच्या सामाजिक आणि माध्यमांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. त्यांच्या आंदोलनाची शैली सुरुवातीपासूनच आक्रमक राहिली. निवेदन, चर्चा किंवा केवळ प्रतीकात्मक आंदोलन यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून प्रश्न उपस्थित करण्यावर त्यांचा भर राहिला. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली; त्याचबरोबर त्यांच्या कार्यपद्धतीवर टीकाही झाली. तृप्ती देसाई यांचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणारे सर्वात मोठे आंदोलन म्हणजे शनी शिंगणापूर मंदिरातील महिलांच्या प्रवेशाचा प्रश्न.

महिलांना शनीच्या चौथऱ्यावर प्रवेश नाकारण्याच्या प्रथेविरोधात त्यांनी भूमाता ब्रिगेडच्या माध्यमातून आंदोलन उभारले. २०१६ मध्ये हा प्रश्न राज्यभर चर्चेचा विषय बनला. मुंबई उच्च न्यायालयाने धार्मिक स्थळांवर पुरुष आणि महिलांना समान प्रवेशाचा अधिकार असल्याचे स्पष्ट केल्यानंतरही शनी शिंगणापूरमध्ये प्रत्यक्ष प्रवेशाचा प्रश्न तणावपूर्ण राहिला. आंदोलनादरम्यान तृप्ती देसाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या तसेच आंदोलक आणि स्थानिकांमध्ये संघर्ष झाल्याच्या घटना घडल्या.

या संघर्षानंतर शनी शिंगणापूर मंदिरात महिलांच्या प्रवेशाचा मार्ग खुला झाला. या विजयामुळे तृप्ती देसाई यांना राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली. त्यानंतर त्यांचा महिला हक्कांचा लढा केवळ एका मंदिरापुरता मर्यादित राहिला नाही.

**'परंपरा' विरुद्ध 'समानता' : तृप्ती देसाईंचा मूलभूत प्रश्न**

तृप्ती देसाई यांच्या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी धार्मिक परंपरेवर थेट प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या मते, श्रद्धा आणि धर्माला विरोध करणे हा आंदोलनाचा उद्देश नसून, धर्माच्या नावाखाली महिलांशी केला जाणारा भेदभाव हा प्रश्न आहे.

२०१६ मध्ये त्यांनी लिहिलेल्या एका लेखातही त्यांनी महिलांना धार्मिक स्थळांच्या गाभाऱ्यात प्रवेश नाकारण्याच्या प्रथांवर प्रश्न उपस्थित केला होता. महिलांना दुय्यम स्थान देणाऱ्या परंपरांचा पुनर्विचार व्हायला हवा, अशी त्यांची भूमिका होती.

ही भूमिका अनेक महिलांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेरणादायी वाटली. मात्र, दुसरीकडे त्यांच्या आंदोलनाच्या आक्रमक शैलीवर आणि प्रसिद्धीच्या पद्धतीवर टीकाही झाली. भूमाता ब्रिगेडमधील काही पदाधिकाऱ्यांनी २०१६ मध्ये संघटनेपासून वेगळे होताना त्यांच्या कार्यपद्धतीवर सार्वजनिक टीका केली होती.

म्हणजेच तृप्ती देसाईंचा प्रवास हा केवळ विजयांचा प्रवास नाही; त्यात संघर्ष, विरोध, आरोप-प्रत्यारोप आणि मतभेदही आहेत. कदाचित यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक चर्चेत राहिले.

**हाजी अलीपासून शबरीमालेपर्यंत**

शनी शिंगणापूरच्या आंदोलनानंतर तृप्ती देसाई यांनी महिलांच्या धार्मिक स्थळांवरील समान प्रवेशाचा मुद्दा इतर ठिकाणीही पुढे नेला.

मुंबईतील हाजी अली दर्ग्यात महिलांना समान प्रवेश मिळावा, या मागणीला त्यांनी पाठिंबा दिला. एप्रिल २०१६ मध्ये त्यांनी हाजी अलीकडे जाण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी त्यांना रोखले आणि त्यांना ताब्यात घेण्यात आले. यानंतर त्यांनी हाजी अली दर्ग्यातील महिलांच्या प्रवेशाचा प्रश्न सातत्याने उपस्थित केला. मे २०१६ मध्ये त्या दर्ग्यात गेल्या आणि महिलांना समान प्रवेश मिळावा, अशी प्रार्थना केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले.

पुढे नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिरासह अन्य धार्मिक स्थळांमधील प्रवेशाच्या प्रश्नांवरही त्यांनी भूमिका घेतली. त्र्यंबकेश्वर आणि नाशिकमधील कपालेश्वर मंदिरातील प्रवेशाच्या प्रश्नांवर भूमाता ब्रिगेडने आंदोलन केले होते.

२०१८ मध्ये शबरीमाला मंदिरातील महिलांच्या प्रवेशाचा प्रश्न देशभर चर्चेत असताना तृप्ती देसाई यांनीही या मुद्द्यावर भूमिका घेतली. महिलांना संविधानाने समान हक्क दिले आहेत, हा त्यांच्या भूमिकेचा केंद्रबिंदू होता.

**फक्त मंदिर प्रवेश नव्हे, तर 'हक्क' हा केंद्रबिंदू**

तृप्ती देसाई यांच्या कार्याकडे केवळ 'मंदिर प्रवेशासाठी आंदोलन करणारी महिला' म्हणून पाहणे त्यांच्या सामाजिक प्रवासाला मर्यादित करणारे ठरेल.

त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू 'समान हक्क' हा राहिला आहे. धार्मिक स्थळांमध्ये महिलांना समान अधिकार मिळावा, सामाजिक व्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान देणाऱ्या रूढींना प्रश्न विचारला जावा आणि अन्यायाविरोधात आवाज उठवला जावा, अशी त्यांची व्यापक भूमिका दिसून येते. याच कारणामुळे त्यांचे आंदोलन एका विशिष्ट धर्मापुरते मर्यादित राहिले नाही. हाजी अली दर्ग्याच्या प्रश्नावरही त्यांनी महिलांच्या समान अधिकाराची भूमिका मांडली होती.

**शनी शिंगणापूरनंतरही प्रश्न संपले नाहीत**

शनी शिंगणापूरमधील महिलांच्या प्रवेशाचा प्रश्न सुटला असला तरी तृप्ती देसाईंची सक्रियता थांबली नाही. २०२५ मध्ये त्यांनी शनी शिंगणापूरच्या चौथऱ्यावर दर्शनासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काला विरोध केला. सर्व भाविकांना समान आणि मोफत दर्शन मिळावे, अशी त्यांची मागणी होती. यातून एक बाब स्पष्ट होते ज्या प्रश्नावर आंदोलन करून बदल घडवून आणला, त्या ठिकाणच्या पुढील व्यवस्थेवरही लक्ष ठेवण्याची त्यांची भूमिका कायम आहे.

**तृप्ती देसाई : एका आंदोलनाची ओळख की एका विचाराची?**

तृप्ती देसाईंच्या प्रवासाचे मूल्यमापन करताना त्यांना केवळ 'आंदोलन करणारी महिला' म्हणून पाहणे पुरेसे नाही. त्यांनी महाराष्ट्रातील महिलांच्या धार्मिक प्रवेशाच्या प्रश्नाला राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. शनी शिंगणापूरपासून हाजी अली आणि शबरीमालापर्यंत त्यांनी समानतेचा मुद्दा सातत्याने मांडला.

त्यांच्या कार्याला समर्थनही मिळाले आणि तीव्र विरोधही झाला. त्यांच्या आंदोलनाच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले; पण त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न मात्र सार्वजनिक चर्चेत आले. यशस्वी सामाजिक आंदोलनाची हीच कदाचित मोठी ताकद असते ते केवळ उत्तर देत नाही, तर समाजाला प्रश्न विचारायला भाग पाडते. तृप्ती देसाईंच्या बाबतीत हा प्रश्न आहे परंपरा मोठी की समानता? व्यवस्था मोठी की नागरिकाचा अधिकार? आणि एखादा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित राहिला, तर त्याला आव्हान देण्यासाठी रस्त्यावर उतरले पाहिजे की व्यवस्थेतील बदलाची वाट पाहिली पाहिजे?

या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकाची वेगळी असू शकतात. मात्र तृप्ती देसाई यांनी गेल्या दोन दशकांतील आपल्या सार्वजनिक प्रवासातून एक गोष्ट नक्की दाखवून दिली आहे प्रश्न विचारण्याचे धाडस असेल, तर छोटा वाटणारा मुद्दाही राष्ट्रीय चर्चेचा विषय बनू शकतो.

आता 'बीड फाइल्स'सारख्या सामाजिक आशयाच्या चित्रपटाच्या माध्यमातून गुन्हेगारी, असुरक्षितता आणि व्यवस्थेच्या प्रश्नांवर चर्चा सुरू होत असताना तृप्ती देसाई यांच्यासारख्या सातत्याने व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची आठवण होणे स्वाभाविक आहे. बीडमधील वास्तव पडद्यावर येणार आहे; पण त्या वास्तवावर समाज किती प्रश्न विचारतो, हेच कदाचित या चित्रपटापलीकडचे खरे आव्हान ठरणार आहे.

• • •



**मा. प्रतिक गंगणे - शाईचा प्रवास**
**मोबाईल : 7276314142**

### आंदोलनाची आक्रमक शैली : ताकद की वादाचा मुद्दा?

तृप्ती देसाई यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना त्यांच्या आंदोलनाच्या शैलीकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्या थेट संघर्षाची भूमिका घेतात. प्रशासनाला आव्हान देतात. बंदी किंवा अडथळे असतील तर ते मोडून काढण्याचा प्रयत्न करतात. परिणामी त्यांच्या आंदोलनाला माध्यमांचे मोठे लक्ष मिळते. हीच शैली त्यांच्या समर्थकांच्या दृष्टीने त्यांची ताकद आहे. मात्र विरोधकांच्या दृष्टीने ती प्रसिद्धी मिळवण्याची पद्धत किंवा संघर्ष वाढवणारी भूमिका ठरते. २०१६ मध्ये भूमाता ब्रिगेडमधून बाहेर पडलेल्या काही पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती. त्यामुळे तृप्ती देसाईंचे व्यक्तिमत्त्व एका सरळ चौकटीत बसत नाही. त्या जितक्या समर्थकांसाठी धाडसी महिला कार्यकर्त्या आहेत, तितक्याच त्यांच्या विरोधकांसाठी वादग्रस्त आंदोलकही आहेत.

### विरोधाला सामोरे जाण्याची तयारी

त्यांच्या आंदोलनांना अनेकदा तीव्र विरोध झाला. शनी शिंगणापूर आंदोलनाच्या काळात त्यांना धमकीचे पत्रही मिळाले होते. हाजी अली आंदोलनादरम्यानही त्यांच्या विरोधात घोषणाबाजी झाली आणि त्यांना विरोध करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांकडून धमक्यांचा सामना करावा लागला. या घटनांमुळे त्यांची प्रतिमा अधिक आक्रमक आंदोलक म्हणून दृढ झाली. मात्र त्याचवेळी सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवताना कार्यकर्त्यांना कोणत्या प्रकारच्या विरोधाचा सामना करावा लागतो, याचेही हे उदाहरण ठरले.

### 'बीड फाइल्स'च्या निमित्ताने तृप्ती देसाईंकडे पुन्हा पाहण्याची संधी

याच पार्श्वभूमीवर आता 'बीड फाइल्स' हा चित्रपट चर्चेत येतो. बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न, व्यवस्थेतील त्रुटी आणि सामान्य नागरिकांच्या असुरक्षिततेचा विषय या चित्रपटातून मांडला जाणार असल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले आहे. या चित्रपटाच्या आशयाशी तृप्ती देसाईंच्या सार्वजनिक प्रवासाचा एक महत्त्वाचा धागा जोडला जातो तो म्हणजे व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची वृत्ती. तृप्ती देसाईंचा संघर्ष धार्मिक रूढींविरुद्ध होता; 'बीड फाइल्स'चा केंद्रबिंदू गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. विषय वेगळे असले तरी अन्याय, असमानता आणि व्यवस्थेतील त्रुटींविरोधात प्रश्न उपस्थित करण्याची भूमिका या दोन्ही संदर्भांमध्ये दिसते. म्हणूनच 'बीड फाइल्स'च्या निमित्ताने तृप्ती देसाईंच्या कार्याकडे नव्या संदर्भात पाहिले जाऊ शकते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.